


सत्यमेव जयते

**अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५


जा.क्र. आर्टी/योजना विभाग/CET/२०२५-२६/०२३७ दिनांक :- १०/११/२०२५

**बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती आणि आर्टी द्वारे स्पर्धात्मक परीक्षा पूर्व-प्रशिक्षण योजना २०२५-२६ साठी आयोजित केलेल्या सामयिक प्रवेश परीक्षांमध्ये प्राप्त झालेले गुण पाहण्याची सोय उपलब्ध करून देणेबाबत**

महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती आणि आर्टी या संस्थांच्या लाभार्थी गटांकरिता राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२५-२६ संबंधित विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता सर्वकष धोरणांतर्गत सामयिक प्रवेश परीक्षांचे (Common Entrance Tests) आयोजन दि. १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ व दि. १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या परीक्षांमधील प्रश्न/उत्तरे संदर्भात answer key/response sheet आणि आक्षेप नोंदविण्यासाठीची सुविधा challenge portal द्वारे दि. ६ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ व दि. १९ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आले होते.

दिनांक ०४/११/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रक-१ व प्रसिद्धीपत्रक-२ नुसार उमदेवारांना त्यांच्या निकालाची प्रत (Score card) दिनांक ११/११/२०२५ पासून दिनांक १४/११/२०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे. ज्यामध्ये उमेदवाराचे Obtained Marks तसेच Percentile Score (Normalization Score) यांचा अंतर्भाव असेल.

निकालाची प्रत (Score card) उपलब्ध करून घेण्यासाठी उमेदवारांनी बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय आणि आर्टी या संस्थांचा ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या URL लिंकला Login करून आपला ईमेल आयडी व PASSWORD (ऑनलाईन फॉर्म भरताना जो username a password वापरला आहे तो) बाबत योग्य ती माहिती नोंदवून निकालाची प्रत (Score card) उपलब्ध करून घ्यावी.

परीक्षा निहाय अंतिम गुणवत्ता याद्या या सामान्यीकृत गुणांनुसार (Percentile Score(Normalization Score)) संबंधित संस्थेमार्फत प्रसिद्ध केल्या जातील. तरी सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

(सुनील वारे)

**व्यवस्थापकीय संचालक**

**अण्णा भाऊ साठे संशोधन व**

**प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**